मालवणी, अंबोजवाडी परिसरात शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित >> पान 2

न्यायालये केवळ इमारती नसून लोकशाही मूल्यांचे प्रतीक : सरन्यायाधीश भूषण गवई >> पान 3

बजाज फायनॅन्सने सणासुदीच्या कर्जांमध्ये २७% वाढ नोंदविली >> पान 4

**सुविचार**

आपण आपल्या कर्मावर विश्वास ठेवावा.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 93 ■ गुरूवार, दि. 06 नोव्हेंबर 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




इक्कीस चित्रपटातून अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण, अगस्त्य नंदा दिसणार प्रमुख भूमिकेत

आतील पान

## सरकारची ३५०० जागांसाठी जाहिरात, एनटी प्रवर्गासाठी एकही जागा नाही; धनंजय मुंडेंचा संताप, आरोग्यमंत्र्यांना पत्र

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : राज्य सरकारने मेगा भरतीचे आश्वासन दिले होते, त्यानुसार विविध विभागातील रिक्त पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध केली जात असून उमेदवारांची भरती केली जात आहे. आता, राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने कंत्राटी पद्धतीने ३५०० जागांसाठी भरती काढण्यात आली आहे. मात्र, या भरतीमध्ये एनटी प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित नसल्याने नवा वाद निर्माण झाला आहे. एनटी प्रवर्गातील विद्यार्थी, उमेदवारांनी ही बाब निदर्शनास आणून दिल्यानंतर आता राज्याचे माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी देखील याबाबत आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांना पत्र लिहून ही जाहिरात रद्द करण्याची, व नव्याने प्रसिद्ध करण्याची मागणी केली आहे. राज्य शासनाने राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत ४ नोव्हेंबर २०२५ रोजी समूदाय आरोग्य अधिकारी (कंत्राटी) या पदाच्या सुमारे १९७४ पदांच्या भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली असून या जाहिराती मध्ये एन टी डी प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे.

## दहशतवादी संघटनेचा प्रसार-प्रचार करणाऱ्या जुबेरचे परदेशात संबंध! 'एटीएस'ची सखोल चौकशी सुरु

दैनिक आपला विदर्भ


**पुणे/प्रतिनिधी** : 'अल कायदा इन इंडियन सबकॉंटिनेन्ट' (एक्यूआयएस) या दहशतवादी संघटनेच्या समर्थनार्थ जिहादचा प्रसार-प्रचार करून देशाच्या एकता व सुरक्षिततेला धोका निर्माण केल्याच्या आरोपावरून जुबेर इलियास हंगरगेकर याला 'एटीएस'ने २७ ऑक्टोबर रोजी अटक केली. जुबेर कोंढव्यातील कौसरबाग येथे कुराण, हदीस, खिलाफत या विषयांवर आक्रमक उपदेश द्यायचा. त्याला अटक झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याच्या साथीदारांनी या ठिकाणावरून काही संशयित पुस्तके, प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे गोळा करून काळेपडळ येथील एका मदरशाच्या मोकळ्या जागेत जाळल्याचे महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाच्या तपासात समोर आले आहे. त्यामुळे जुबेरच्या साथीदारांना सुद्धा एटीएसने ताब्यात घेतले आहे.

'एटीएस'च्या तपास पथकाने काळेपडळ येथील मदरशाच्या मोकळ्या जागेचा पंचनामा करत काही अर्धवट जळालेली कागदपत्रे ताब्यात घेतली. याव्यतिरिक्त जुबेर व त्याचे साथीदार कौसरबागेतील एका इमारतीच्या तळघरातील मदरशामध्ये एकत्रित जमायचे अशी माहिती तपासादरम्यान अधिकाऱ्यांनी मिळाली. त्यामुळे तपास अधिकाऱ्यांनी तळघरातील मदरशाचा पंचनामा केला असून, सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले आहेत. जुबेरची खोल चौकशी करण्यासाठी त्याच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी विशेष सरकारी वकील विजय फरगडे व तपास अधिकारी सहायक आयुक्त अनिल शेवाळ यांनी केली असल्याने त्याच्या कोठडीत १४ नोव्हेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. दरम्यान जुबेरच्या जवळच्या साथीदारांपैकी १८ जणांचे जबाब नोंदविण्यात आले आहेत.

# सीमा, विमला, सरस्वती...एकाच ब्राझिलीयन मॉडेलचे २२ वेळा मतदान, राहुल गांधींनी थेट पुरावाच दाखवला

नवी दिल्ली : काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज आपल्या पत्रकार परिषदेत मतचोरीचा आरोप करत आरोपांचा मोठा बॉम्ब फोडला. हरियाणा विधानसभा निवडणुकीत मतचोरी झाली असल्याचा आरोप करत राहुल गांधी यांनी आज पुरावेच सादर केले. ब्राझीलच्या मॉडेलने हरियाणामध्ये मतदान केले असल्याचा आरोप त्यांनी केला.

राहुल गांधी यांनी म्हटले की, पूर्ण जबाबदारीने मी सत्य बोलतोय. हरियाणा, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्रात मतदान चोरीचा संशय होता. हरियाणाची आम्ही निवड केली आहे. निवडणुकीनंतर सर्व एग्झिट पोल्सनी काँग्रेसला क्लीन स्वीप दिलं होतं, पण पोस्टल आणि प्रत्यक्ष मतांमध्ये मोठा फरक होता. डेटाच्या आधारे आम्ही हरियाणामध्ये ही मतदान चोरी सिद्ध करू. जनतेसाठी हे




अत्यंत महत्त्वाचं असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

शंभर टक्के पुराव्यांसह मी या प्रकरणाशी संबंधित तथ्यं सादर करणार असल्याचे सांगत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केला. पत्रकार परिषदेत राहुल गांधी भाजप नेत्याचा व्हिडीओ दाखवला. हरियाणा निवडणुकीनंतर दोन दिवसांनी मुख्यमंत्री नायब सिंग सैनी यांची बाईट दाखवण्यात आली. यामध्ये त्यांनी आम्ही एकतर्फी विजयाचा दावा केला होता. आम्ही सगळी व्यवस्था केली असल्याचे वक्तव्य त्यांनी केले होते. राहुल यांनी या वक्तव्यावर सैनी यांच्या स्मितहास्याकडे लक्ष वेधले. राहुल गांधींकडून एका महिलेचा फोटो दाखवण्यात आला. हरियाणामध्ये या महिलेने २२ वेळा मतदान केल्याचा आरोप केला. सरस्वती, लक्ष्मी, अशी वेगवेगळी नावे असून वेगवेगळ्या बुथवर नावे मतदान असल्याचे राहुल गांधींचा दावा त्यांनी केला. हरियाणा निवडणुकीदरम्यान ही महिला २२ वेळा मतदान केल्याचं आम्हाला आढळलं आहे. हे मतदान तेही बनावट ओळखपत्रांच्या माध्यमातून करण्यात आल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले.

कर्नाटक सारखा प्रकार इथही घडला. एकाच ठिकाणाहून ठरवलेला घोटाळा असल्याचे राहुल गांधी यांनी सांगितले. विमला, सरस्वती नावाने मतदान करणारी तरुणी ही ब्राझीलची तरुणी आहे. ब्राझीलची तरुणीचे हरियाणाच्या निवडणुकीत काय काम? असा सवाल राहुल गांधी यांनी केला. या महिलेच्या फोटोवर आधारित बनावट आयडी केवळ दोन मतदान केंद्रांमध्येच दोनशेहून अधिक वेगवेगळ्या नावांनी अस्तित्वात आहेत.

दोन पोलिंग बूथ्सवरील सीसीटीव्ही फुटेज जानबूजकर डिलीट करण्यात आलं आहे, असं आमचं म्हणणं आहे. अशाच प्रकारे अनेक ठिकाणी ब्लर फोटो असलेली आयडी वापरून मतदान केलं गेलं. म्हणजे फसवणुकीचा पद्धतशीर डाव रचला गेला होता असा आरोपही राहुल गांधी यांनी केला.

## निवडणूक आयोगाचं उत्तर; १५ मुद्द्यांमध्ये सांगितला काँग्रेस नेत्याचा दावा 'खोटा'



नवी दिल्ली : हरियाणातील निवडणूक २५ लाख बोगस मतदारांच्या माध्यमातून चोरण्यात आल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केली. २ कोटी मतदारांपैकी २५ लाख मतदार हे बोगस आहेत, हरियाणातील प्रत्येक आठवा मतदार हा खोटा असल्याचा दावा राहुल गांधींनी केला. त्यावर आता हरियाणा निवडणूक आयोगाने स्पष्टीकरण दिलं आहे. विधानसभा निवडणूक ही पारदर्शक पद्धतीने पार पडली असून त्यावेळी काँग्रेसने कोणताही आक्षेप घेतला नव्हता किंवा तशी तक्रार दाखल केली नव्हती असं आयोगाने म्हटलं.

राहुल गांधींनी केलेल्या आरोपांवर निवडणूक आयोगाने उत्तर दिलं असून १५ मुद्द्यांच्या आधारे निवडणूक कशी पारदर्शक पद्धतीने पार पडली याचे स्पष्टीकरण दिलं.

**निवडणूक आयोगाने स्पष्ट केलेले मुद्दे खालीलप्रमाणे,**

१. निवडणुकीसाठी ०२ ऑगस्ट २०२४ रोजी मसुदा मतदार यादी प्रकाशित करण्यात आली आणि सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत शेअर करण्यात आली.

२. एसएसआर दरम्यान प्राप्त झालेल्या दावा आणि आक्षेपांची एकूण >> पान २

## राहुल गांधींनी निवडणूक आयोगाचा 'ब्राझील कारनामा' समोर आणताच भाजपचा संताप; परदेशातून प्रेरणा मिळत असल्याचा केला आरोप

**मुंबई/प्रतिनिधी** : लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज (५ नोव्हेंबर) तिसऱ्यांदा व्हिडिओ सादरीकरण करत भाजप आणि निवडणूक आयोगावर मतदार यादीत घोटाळ्याचा आरोप केला. राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपानंतर केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी प्रत्युत्तर दिले. रिजिजू म्हणाले, राहुल यांनी दिलेले सादरीकरण खोटे होते. राहुल गांधींनी त्यांच्या पत्रकार परिषदेत काही परदेशी महिलांची नावे सांगितली. संसदेचे अधिवेशन सुरू असताना ते परदेशात जातात. ते गुप्तपणे थायलंड आणि कंबोडियाला जातात. परदेशातून मिळणाऱ्या प्रेरणेवर आधारित ते लोकांचा वेळ वाया घालवतात.

केंद्रीय मंत्री म्हणाले, आम्हीही अनेक निवडणुका हरलो आहोत, पण आम्ही कधीही तक्रार केली



नाही. आम्ही कधीही निवडणूक आयोगाचा गैरवापर केला नाही. आम्ही नेहमीच निकालांचे स्वागत केले. उद्या बिहारमध्ये निवडणुका आहेत. लक्ष विचलित करण्यासाठी ते हा मुद्दा उपस्थित करत आहेत. राहुल म्हणतात की अणुबॉम्ब फुटणार आहे. त्यांचा अणुबॉम्ब कधीच का फुटत नाही? रिजिजू म्हणाले, बिहारमध्ये लोक एसआयआरवर खूश आहेत, राहुल रडत आहेत. हरियाणा निवडणुकीबद्दल राहुल गांधींच्या आरोपांना उत्तर देताना रिजिजू म्हणाले, एक्झिट पोल आणि ओपिनियन पोलमध्ये धांधली आहे. २००४ मध्ये भाजप एक्झिट पोलमध्ये जिंकत होता, पण निकालांमध्ये हरला. लोकशाहीमध्ये विजय किंवा पराभव स्वीकारला पाहिजे. आम्ही निवडणूक आयोग, एक्झिट पोल किंवा ओपिनियन पोलचा गैरवापर केला नाही. केंद्रीय मंत्री म्हणाले, एसआयआर आता जे करत आहे ते मतदार शुद्धीकरणासाठी आहे. सर्वजण त्यावर आनंदी आहेत, परंतु राहुल रडत आहेत. जिथे एसआयआर लागू केला गेला आहे, तिथे लोक आनंदी आहेत. बिहारमध्ये लोक म्हणत आहेत की राहुल जिथे जातात तिथे गोष्टी चुकीच्या होतात. >> पान २

# वैद्यकीय प्रवेश निकालाचा घोळ न्यायालयात; सरकारला भूमिका मांडण्याचे निर्देश

## सुनावणी आता १३ नोव्हेंबरला

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :वैद्यकीय प्रवेशाच्या गट ब अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या फेरीच्या निकालांची घोषणा २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या वैद्यकीय प्रवेशाच्या गट अ अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या फेरीच्या निकालांपूर्वीच करण्यात आली आहे. याला आक्षेप घेण्यात दाखल केलेल्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. न्यायमूर्ती रवींद्र व्ही. घुगे आणि न्यायमूर्ती अश्विन डी. भोबे यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला भूमिका मांडण्याचे निर्देश देत याचिकेची पुढील सुनावणी १३ नोव्हेंबरला निश्चित केली.

वैद्यकीय प्रवेश घेऊ इच्छिणारी पुण्यातील विद्यार्थिनी पूर्वा वाघ हिने यासंदर्भात उच्च न्यायालयात दाद मागत याचिका दाखल केली. वैद्यकीय प्रवेश अभ्यासक्रमांच्या निकालाच्या घोषणेत मोठा घोळ घालण्यात आला असून त्याचा फटक बसून मला वैद्यकीय प्रवेशाची संधी गमावावी लागली आहे, असा दावा याचिकाकर्त्या विद्यार्थिनीने केला आहे. याचिकेवर न्या. रवींद्र व्ही. घुगे आणि न्या. अश्विन डी. भोबे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. राहुल कामेरकर यांनी वाघ हिला गट अ अभ्यासक्रमांच्या निकालात प्रवेश मिळाला आहे.

तथापि, गट अ अभ्यासक्रमांच्या तिसऱ्या फेरीचा निकाल गट अ निकालापूर्वी जाहीर करण्यात आल्याने पुढील फेरीत सहभागी होण्यास मनाई



केली गेली आहे याकडे न्यायालयाचे लक्ष वेधण्यात आले.

न्यायालयाने याचिकेची दखल घेत राज्य सरकारला भूमिका मांडण्याचे निर्देश देत पुढील सुनावणी १३ नोव्हेंबरला निश्चित केली.

# नगर परिषद निवडणूक जाहीर होताच साताऱ्यात पृथ्वीराज चव्हाणांना धक्का

## ➤ निष्ठावंत नेताच फडणवीसांच्या भेटीला




दैनिक आपला विदर्भ

**सातारा/प्रतिनिधी** : महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांच्या निवडणुकांचं बिगुल अखेर वाजलं. राज्य निवडणूक आयोगानं राज्यातील १४६ नगरपरिषद आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांच्या तारखांची घोषणा केली. महाराष्ट्रात काँग्रेसच्या ताब्यात एकमेव एकहाती सत्ता असलेली मलकापूर नगरपरिषद आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचे कट्टर, निष्ठावंत असलेले मलकापूर नगर परिषदेचे प्रमुख नेते, माजी उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे हे भाजपच्या गळाला लागले असून त्यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. त्यामुळे साताऱ्यात निवडणुका जाहीर होताच काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

गेल्या अनेक दिवसापासून 'वेट अँड वॉच'वर असलेले मनोहर शिंदे याचे भाजपाशी टायमिंग जुळलं आहे. मात्र अद्याप मुहूर्त ठरेना अशी स्थिती आहे. परंतु येत्या काही दिवसात त्यांचा पक्षप्रवेश निश्चित झाल्याचे सूत्रांकडून सांगितले जात आहे.

सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यात मलकापूर नगरपरिषद २००९ साली अस्तित्वात आली असून तेव्हापासून काँग्रेसची एकहाती सत्ता आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या नगर परिषदेसाठी मोठ्या प्रमाणावर निधी दिला आहे. तसेच माजी उपनगराध्यक्ष मनोहर शिंदे यांनी या नगर परिषदेत काँग्रेसचे नेतृत्व केले आहे. गेल्या काही दिवसांपासून मनोहर शिंदे भाजपमध्ये जाणार अशा चर्चा होत्या. त्यानंतर शिंदे शिवसेना आणि अजित दादांच्या राष्ट्रवादीची ही चाचपणी केली. मात्र, आज दिवसभर ते मुंबईत ठाण मांडून आहेत. यावेळी त्यांनी भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या समवेत सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली आहे. मनोहर शिंदे यांच्या या भेटीमुळे काँग्रेसला आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांना मोठा धक्का मानला जात आहे. आजच नगरपरिषदेचा निवडणुका जाहीर होत असताना काँग्रेसला हा धक्का बसल्याने मलकापूर नगरपरिषदेत भाजपाचे वर्चस्व राहील असे बोलले जात आहे.



साताऱ्यातील कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघात काँग्रेस आणि भाजप यांच्यात मोठी चुरस पाहायला मिळत आहे. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण आणि जिल्हाध्यक्ष आमदार डॉक्टर अतुल भोसले यांच्या कार्यकर्त्यांच्या पदाधिकाऱ्यांच्या मोठे राजकारण पाहायला मिळते. मात्र आजची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट मलकापूरला निधी मिळावा. यासाठी असल्याचे आता सांगण्यात येत आहे. परंतु आता कराडकर ही भेट नक्की कशासाठी आहे हे जाणून आहेत.



>> पान २

## हॅप्पी बर्थडे किंग कोहली !

क्रिकेटचा किंग, चेस मास्टर, विक्रमवीर, रन मशिन यासारखी अनेक बिरुदावली ज्याच्या नावापुढे लागली आहेत तो भारताचाच नव्हे तर जगातील सर्वोत्तम फलंदाज, भारताचा कोहिनूर विराट कोहलीचा काल म्हणजे ५ नोव्हेंबर रोजी ३७ वा वाढदिवस होता. किंग कोहलीला ३७ व्या वाढदिवसाच्या सर्वप्रथम हार्दिक शुभेच्छा! क्रिकेट या खेळाने जगाला अनेक महान खेळाडू दिले. सचिन तेंडुलकर हा त्यापैकीच एक महान खेळाडू. क्रिकेटमधील दैदिप्यमान कामगिरीने तो क्रिकेटचा देव बनला. जवळपास दोन तप त्याने क्रिकेटवर अधिराज्य गाजवले. भारताला अनेक अविश्र्वसनीय विजय त्याने मिळवून दिले. २०१३ साली त्याने निवृत्ती स्वीकारली. निवृत्ती स्वीकारण्यापूर्वी त्याने विक्रमांचे एव्हरेस्ट गाठले. तो निवृत्त झाल्यावर त्याच्या इतक्या क्षमतेचा खेळाडू पुन्हा भारताला मिळेल का ? असाच प्रश्र्न संपूर्ण क्रिकेट विश्र्वाला पडला होता. ज्या प्रश्र्नाचे उत्तर कोणाकडेच नव्हते त्या प्रश्र्नाचे उत्तर खुद्द सचिनकडे होते. सचिनला जेंव्हा प्रश्र्न विचारण्यात आले की तुझा विश्र्वविक्रम कोणता खेळाडू मोडेल असे तुला वाटते तेंव्हा त्याने क्षणाचाही विलंब न करता उत्तर दिले 'विराट कोहली' सर्वांना त्यावेळी ही अतिशोक्ती वाटली पण सचिनने विराटची गुणवत्ता हेरली होती. निवृत्त होण्यापूर्वी चार पाच वर्ष तो आणि विराट एकत्र खेळले होते त्यामुळे विराट कोणत्या क्षमतेचा खेळाडू आहे आणि तो काय करू शकतो हे सचिनला माहीत होते त्यामुळेच सचिनने आपला वारसदार म्हणून विराटची निवड केली होती. विराटने सचिनचे म्हणणे अवघ्या दहा वर्षात खरे करून दाखवले आणि सचिनचा विश्र्वास सार्थ ठरविला. आज विराट देखील सचिन प्रमाणे विक्रमांचे इमले चढत आहेत इतकेच नाही तर सचिनचे अनेक विक्रम त्याच्या दृष्टिक्षेपात आले आहेत. सचिनच्या एकदिवसीय शतकांचा विक्रम त्याने नुकताच मोडला असून त्याच्या नावावर आता ५१ एकदिवसीय शतक आहेत. त्याने त्याच्या कारकीर्दीत एकूण ८२ शतक झळकावले आहेत. एकदिवसीय क्रिकेट प्रमाणेच विराट सचिनच्या एकूण १०० शतकांचा विक्रमही लवकरच आपल्या नावे करेल असा विश्र्वास क्रिकेटप्रेमींना होता. आज त्याच्या नावे ८२ शतके आहेत. कसोटीत त्याने ३० शतके झळकावली आहेत तर एकदिवसीय सामन्यात ५१ शतके त्याच्या नावावर आहेत. टी २० सामन्यातही त्याचे एक शतक आहे. आज तो ३७ वर्षाचा झाला आहे. त्याचा फिटनेस जबरदस्त आहे. वीस वर्षाचा खेळाडू देखील त्याच्यासमोर फिका पडेल असा त्याचा फिटनेस आहे त्यामुळे तो आणखी दोन – तीन वर्ष सहज खेळू शकतो मात्र त्याने कसोटी आणि टी २० प्रकारातून निवृत्ती घेतली आहे तो आता फक्त एकदिवसीय क्रिकेट खेळत असल्याने सचिनच्या १०० शतकांचा विक्रम विराटकडून मोडण्याची शक्यता धूसर झाली असली तरी तोच सचिनचा खरा वारस आहे हे देखील त्याने सिद्ध केले आहे. विराटच्या जवळपास जगातील दुसरा कोणताच खेळाडू नाही. विराट केवळ विक्रमवीर नाही तर तो आज जगातला महान फलंदाज बनला आहे. उत्तम खेळाडू ते महान खेळाडू बनण्यापर्यंतचा त्याचा प्रवास अचंबित करणारा आहे. अवघ्या दहा बारा वर्षात तो आज जगातला महान खेळाडू बनला आहे. त्याने धावांची टांकसाळ उभारली आहे. प्रत्येक सामन्यात तो खोऱ्याने धावा काढत आहे. त्याची बॅट म्हणजे जणू धावांची मशिन, त्याच्या बॅट मधून धावांची बरसात होत आहे म्हणूनच आकाश चोप्रा त्याला विराट द रन मशिन कोहली असे म्हणतो. त्याने काढलेल्या शतकांपैकी ९५ टक्के शतके भारताच्या विजयास कारणीभूत ठरली आहेत यावरून त्याच्या शतकांचे मोल लक्षात येते. धावांचा पाठलाग करताना तर त्याने सर्वाधिक शतके झळकावली आहेत म्हणूनच त्याला चेस मास्टर असेही म्हंटले जाते. विराटने शतक झळकावले म्हणजे भारत विजयी झाला असेच समीकरण बनले आहे. केवळ शतकच नव्हे तर त्याच्या अनेक छोट्या मोठ्या खेळी भारताला विजय मिळवून देणाऱ्या ठरल्या. भारताला अनेक अविश्र्वसनीय विजय त्याने मिळवून दिले आहेत. ऑस्ट्रेलियात झालेल्या टी २० विश्र्वचषक स्पर्धेतील पाकिस्तान विरुद्धचा सामना आठवा. आपण तो सामना केवळ विराटमुळे जिंकू शकलो. हातातून गेलेला सामना त्याने ज्याप्रकारे खेचून आणला ते पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फिटले. तशी खेळी फक्त आणि फक्त विराटच खेळू शकतो. मागील वर्षी भारताने जिंकलेल्या टी २० विश्र्वचषक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध त्याने ७० धावा काढून भारताला विश्र्व विजयी केले होते. या दोन खेळी फक्त एक उदाहरण आहे. तशा प्रकारच्या अनेक खेळी करून त्याने भारताला अनेक अशक्यप्राय विजय मिळवून दिले आहेत. कठीण समय येता विराट कामी येई.... असे उगीच क्रिकेटप्रेमी म्हणत नाहीत. टी २० विश्र्वचषकात भारताला विजय मिळवून देऊन त्याने क्रिकेट प्रेमिंचे एक स्वप्न पूर्ण केले आहे आता २०२७ मध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्र्वचषक स्पर्धेत त्याने भारताला अजिंक्यपद मिळवून द्यावे अशी क्रिकेटप्रेमींची त्याच्याकडून अपेक्षा आहे. सध्या तो त्याच्या सर्वोत्तम फॉर्ममध्ये नाहीये मात्र तो असा खेळाडू आहे जो कधीही फॉर्मात येऊ शकतो. तो लवकरच सर्वोत्तम फॉर्ममध्ये परतेल आणि भारताला एकदिवसीय विश्र्वचषक स्पर्धेचे अजिंक्यपद मिळवून देईल यात शंका नाही. विराटला पुन्हा एकदा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# मालवणी, अंबोजवाडी परिसरात शासकीय जमिनीवरील अतिक्रमण निष्कासित

## १०००० चौ.मी. शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : मुंबई उपनगर जिल्ह्यातील मौजे मालवणी क्षेत्रातील न.भू.क्र. २६७० व १९१६ या शासकीय जमिनीवर मोठ्या प्रमाणात झालेले अतिक्रमण, तसेच संरक्षित कांदळवन (मॅग्रोव्ह) क्षेत्राला लागून असलेला भराव आणि कत्तल थांबवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने मोठी निष्कासन मोहीम राबवून २८० पेक्षा जास्त अतिक्रमण हटवून सुमारे १०००० चौ.मी. एवढी शासकीय जमीन अतिक्रमणमुक्त करण्याची मोहिम यशस्वीरित्या पार पाडली आहे.

महाराष्ट्र शासनाने २००० पर्यतच्या झोपड्यांना संरक्षण दिले असून त्यानंतर पुन्हा २०११ पर्यंतच्या झोपड्यांना सशुल्क संरक्षण दिले आहे. तथापि, यापुढेही झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमध्ये मोफत घर मिळवण्याच्या उद्देशाने शासकीय जमिनीवर अतिक्रमणे





करण्याची प्रवृत्ती बळावलेली आहे. याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींच्या तक्रारी देखील प्राप्त होत होत्या. याची गंभीर दखल प्रशासनाने घेऊन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेंद्र कल्याणकर व मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी सर्व संबंधित यंत्रणांना कारवाईचे आणि संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश दिले होते.

त्या अनुषंगाने अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का), पश्र्चिम उपनगरे गणेश मिसाळ आणि प्रभारी उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) मालाड विनायक पाडवी यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मालवणी पोलीस ठाणे यांच्या मदतीने दिनांक ३ व ४ नोव्हेंबर २०२५ रोजी ही मोहीम हाती घेतली.

या कारवाईत सुमारे २८० झोपड्या निष्कासित करण्यात आल्या असून, अंदाजे १०००० चौ.मी. झोपडीखालील क्षेत्र मोकळे करण्यात आले आहे. तसेच, अली तलाव या नैसर्गिक तलावाच्या परिसरातील अतिक्रमणे निष्कासित करुन तलाव क्षेत्र अतिक्रमणमुक्त केले आहे. विशेष म्हणजे यापैकी काही अतिक्रमणे २ ते ३ मजल्यांची पक्की बांधकामे होती. अतिक्रमण निष्कासित करतानाची निष्कासन कामगारांची कामगिरी देखील उल्लेखनीय आहे. तसेच अतिक्रमणे निष्कासित करण्यासाठी प्रशासनाने प्रथमच सॅटेलाईट छायाचित्राची मदत घेऊन २०११ नंतरची अतिक्रमण शोधून अतिक्रमणे निष्कासित करण्याची कारवाई सुरु केली आहे. त्यामुळे यापुढे अतिक्रमणे केल्यास ती आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन निष्कासित केले जातील व या नुकसानीची सर्वस्वी जबाबदारी संबंधित अतिक्रमणधारक यांची राहील अशी माहिती जिल्हा प्रशासनाने दिली.

शासकीय जमीन आणि संरक्षित वन क्षेत्रांचे अतिक्रमण कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही आणि अशा प्रकारची कारवाई भविष्यातही सातत्याने सुरू राहील, असे अपर अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) गणेश मिसाळ यांनी कळविले आहे.

पान १ वरून...

## राहुल गांधींनी निवडणूक आयोगाचा 'ब्राझील कारनामा'

मतदानादरम्यान प्रत्येक पक्षाचा एक पोलिंग एजंट असतो. ते कोणाला मतदान केले आणि कोणाला नाही हे तपासतात. बाहेरील निरीक्षक असतात. मतदानात अनियमितता असल्यास, तुम्ही याचिका दाखल करू शकता आणि न्यायालयात जाऊ शकता. मतमोजणीदरम्यान देखील मतदान केले जाते आणि तेव्हाही मतदान एजंट उपस्थित असतात. सर्व काही व्यवस्थेनुसार घडते. ते न्यायालयात जात नाहीत. त्यांचा न्यायव्यवस्थेवर विश्र्वास नाही. लोकशाही अशीच चालू राहील का?

केंद्रीय मंत्री रिजिजू पुढे म्हणाले, आम्ही बराच काळ विरोधी पक्षात होतो. काँग्रेसच्या काळात सरकारने न्यायाधीशांची नियुक्ती केली. आम्ही निवडणुका हरलो तेव्हा आम्ही कधीही लोकशाही व्यवस्थेवर प्रश्र्नचिन्ह उपस्थित केले नाही. आम्ही निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल केली, परंतु देशाचा कधीही गैरवापर केला नाही. राहुल परदेशात जाऊन आपल्या लोकशाहीचा आणि व्यवस्थेचा गैरवापर करतात.

राहुल गांधी यांनी आज काँग्रेस कार्यालयात १ तास २० मिनिटांची पत्रकार परिषद घेतली. त्यात त्यांनी बिहारमध्ये ऑपरेशन सरकार चोरी सुरू असल्याचा आरोप केला. राहुल यांनी बिहारमधील पाच मतदारांना मंचावर बोलावले. प्रत्येकाने त्यांची नावे मतदार यादीतून वगळल्याचे सांगितले. राहुल म्हणाले की हरियाणामध्ये ३.५ लाख मतदारांना यादीतून वगळण्यात आले आहे. बिहारमध्येही हाच ट्रेंड पुन्हा सुरू होत आहे. लोकशाही उलथवून टाकण्यासाठी निवडणुकीपूर्वी मतदार याद्या जाहीर केल्या जातात. त्यांनी त्यांच्या सादरीकरणात हरियाणा मतदार यादी दाखवली आणि सांगितले की हरियाणा निवडणुकीत १० मतदान केंद्रांवर ब्राझिलियन मॉडेलने २२ वेळा मतदान केले. यामुळे २०२४ च्या हरियाणा विधानसभा निवडणुकीत २५ लाख मतांची चोरी झाली. राहुल यांनी भाजप आणि निवडणूक आयोगावर इतर अनेक आरोप केले.

## निवडणूक आयोगाचं उत्तर;

संख्या ४,१६,४०८ होती.

३. बीएलओची एकूण संख्या: २०,६२९

४. अंतिम मतदार यादी २७ ऑगस्ट २०२४ रोजी प्रकाशित करण्यात आली आणि सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांसोबत शेअर करण्यात आली.

५. जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे एठज विरुद्ध दाखल केलेल्या अपीलांची संख्या: ०

६. जिल्हा दंडाधिकाऱ्यांच्या आदेशांविरुद्ध उएज कडे दाखल केलेल्या दुसऱ्या अपीलांची संख्या: ०

७. उमेदवारी मागे घेण्याच्या अंतिम तारखेपर्यंत मतदार यादी अंतिम करण्यात आली आणि १६ सप्टेंबर २०२४ रोजी निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांसोबत शेअर करण्यात आली.

८. मतदान केंद्रांची एकूण संख्या: २०,६३२

९. निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांची एकूण संख्या: १,०३१

१०. सर्व उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतदान प्रतिनिधींची एकूण संख्या: ८६,७९०

११. मतदानाच्या दुसऱ्या दिवशी तपासणीदरम्यान उमेदवारांनी नोंदवलेल्या आक्षेपांची संख्या: ०

१२. मतमोजणीसाठी सर्व उमेदवारांनी नियुक्त केलेल्या मतमोजणी प्रतिनिधींची संख्या: १०,१८०

१३. मतमोजणीदरम्यान ठर्शींीपळपस जषषळलशी ला प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या: ५

१४. निकाल ८ ऑक्टोबर २०२४ रोजी घोषित करण्यात आला.

१५. निवडणुकीला आव्हान देण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या निवडणूक याचिकांची संख्या: २३

निवडणूक झाल्यानंतर विरोधी पक्षाने कोणतीही तक्रार किंवा अपील दाखल केली नाही असा दावा निवडणूक आयोगाने केला. तसेच आयोगाने सगळी प्रक्रिया ही पारदर्शक पद्धतीने पार पाडली आणि आवश्यक ती आकडेवारी सर्व पक्षांसोबत शेअर केल्याचा दावाही करण्यात आला.

# युद्ध, पर्यावरण आणि मानवता : शाश्वत शांततेची सामाजिक गरज

जगाच्या इतिहासावर नजर टाकली तर मानव सभ्यतेच्या प्रगतीसोबतच युद्धाचा इतिहासही तितकाच प्राचीन आहे. परंतु या संघर्षांनी केवळ राष्ट्रांच्या सीमा बदलल्या नाहीत, तर पृथ्वीच्या पर्यावरणीय संतुलनावरही खोल आणि दीर्घकालीन परिणाम केले आहेत. युद्ध म्हणजे फक्त शस्त्रांचा, सत्तेचा आणि भूभागाचा संघर्ष नव्हे, तर तो मानव आणि निसर्ग यांच्या नात्याचा विध्वंस करणारा एक सामाजिक आणि पर्यावरणीय आपत्तीचा प्रकार आहे. म्हणूनच ६ नोव्हेंबर हा दिवस जगभर 'युद्ध आणि सशस्त्र संघर्षांमध्ये पर्यावरणाच्या शोषणास प्रतिबंध करण्याचा आंतरराष्ट्रीय दिन म्हणून साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाने २००१ साली हा दिवस घोषित केला, ज्याचा उद्देश युद्धकाळातील आणि त्यानंतरच्या काळातील पर्यावरणीय नुकसानावर जागतिक समाजाचे लक्ष वेधणे हा आहे.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिल्यास, युद्ध हे केवळ राजकीय घटना नसून मानवी मूल्यांच्या पतनाचे आणि सामाजिक समतोल बिघडण्याचे प्रतीक आहे. समाजाचे आर्थिक, सांस्कृतिक, पर्यावरणीय आणि मानवी पैलू हे परस्परांवर अवलंबून असतात. जेव्हा समाज सत्ता, भूभाग आणि संसाधनांवरील ताब्यासाठी युद्धाच्या मार्गावर जातो, तेव्हा या सर्व घटकांमध्ये असलेले नाजूक संतुलन तुटते. युद्धकाळात होणारे पर्यावरणीय नुकसान हे या असंतुलनाचे सर्वात गंभीर आणि दीर्घकालीन रूप आहे. उदाहरणार्थ, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जर्मनी, जपान आणि इतर देशांमधील औद्योगिक केंद्रे पूर्णपणे उद्ध्वस्त झाली; रासायनिक व किरणोत्सर्गी प्रदूषणामुळे माती व पाण्याचे शेकडो वर्षांसाठी नुकसान झाले. हिरोशिमा आणि नागासाकीवरील अणुबॉम्बच्या स्फोटाने लाखो लोकांचे प्राण घेतले, पण त्याचबरोबर पर्यावरणावर निर्माण झालेला किरणोत्सर्ग आजही त्या प्रदेशातील आरोग्य, शेती आणि जैवविविधतेवर परिणाम करतो आहे.

पर्यावरण म्हणजे केवळ जंगल, पाणी, जमीन किंवा प्राणी नाही, तर ते समाजाच्या अस्तित्वाशी आणि विकासाशी निगडित असलेले जीवनाचे अधिष्ठान आहे. जेव्हा युद्धकाळात नैसर्गिक संसाधनांचा वापर शस्त्र म्हणून केला जातो किंवा पर्यावरणाचा नाश केला जातो, तेव्हा समाजाच्या भविष्यातील जीवनाधारालाच धोका निर्माण होतो. १९९१ मधील आखाती युद्धात इराकी सैन्याने कुवैतमधील तेलविहिरींना आग लावली, ज्यामुळे लाखो टन धूर आणि विषारी वायू वातावरणात पसरले. पाण्याचे स्रोत दूषित झाले, जमिनीची सुपीकता कमी झाली, आणि अनेक प्राण्यांचे अधिवास नष्ट झाले. या घटनेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले की युद्ध केवळ मानवी मृत्यूच नव्हे तर पर्यावरणीय विनाशाचाही मार्ग आहे.संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालानुसार, गेल्या ६० वर्षांतील सुमारे ४० टक्के अंतर्गत आणि आंतरराष्ट्रीय युद्धे नैसर्गिक संसाधनांच्या ताब्यासाठी झाली आहेत. पाणी, तेल, सोने, हिरा, लाकूड आणि जमीन यांसारख्या संपत्तीवर हक्क मिळवण्यासाठी अनेक राष्ट्रांनी हिंसात्मक मार्ग अवलंबला. या संघर्षांमुळे केवळ मानवाची हानी झाली नाही, तर संपूर्ण परिसंस्थांचे अस्तित्व धोक्यात आले. युद्धकाळात जंगलतोड मोठ्या प्रमाणात केली जाते, खाणींचे अंधाधुंद उत्खनन होते, नद्यांमध्ये रासायनिक द्रव्ये मिसळली जातात, आणि प्रदूषणाचा स्तर अनेक पटींनी वाढतो. अशा प्रकारे, युद्ध पर्यावरणीय असमानतेचे आणि हवामानबदलाचे एक महत्त्वाचे कारण ठरते.

समाजशास्त्रीय नजरेतून पाहिल्यास, युद्धाचा पर्यावरणावर परिणाम हा फक्त भौतिक नाशापुरता मर्यादित नसतो. तो समाजाच्या मानसिक, आर्थिक आणि सांस्कृतिक रचनेवरही खोल परिणाम करतो. जेव्हा एखाद्या प्रदेशाचे पर्यावरण उद्ध्वस्त होते, तेव्हा तेथील लोकांना आपली उपजीविका सोडून स्थलांतर करावे लागते. यामुळे 'पर्यावरणीय निर्वासित' किंवा 'इको-रिफ्युजी' नावाचा नवीन सामाजिक वर्ग निर्माण होतो. या स्थलांतरामुळे इतर भागांमध्ये लोकसंख्येचा ताण वाढतो, अन्नसंकट निर्माण होते, आणि सामाजिक संघर्ष निर्माण होतात. त्यामुळे पर्यावरणाचा नाश हा अखेरीस मानवी समाजाच्या एकात्मतेलाच धक्का देतो.

युद्धकाळातील पर्यावरणीय हानीचा आणखी एक गंभीर पैलू म्हणजे लिंगाधारित विषमता होय. संघर्षाच्या काळात महिलांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो. पुरुष युद्धात सहभागी असल्याने घराची जबाबदारी, अन्न-पाण्याची तजवीज आणि मुलांचे संरक्षण यांचा भार महिलांवर येतो. युद्धामुळे पाणी व इंधनाच्या स्रोतांचे नुकसान झाल्याने महिलांना लांब अंतर चालत जावे लागते. यामुळे त्यांच्या आरोग्यावर आणि सुरक्षेवर परिणाम होतो. शिवाय, युद्धकाळातील दारिद्र्य आणि संसाधनांची टंचाई यामुळे महिलांवर अत्याचार, लैंगिक हिंसा आणि जबरदस्तीच्या कामाचे प्रमाण वाढते. त्यामुळे पर्यावरणाचे शोषण आणि महिलांचे शोषण हे युद्धकाळात एकमेकांशी जोडलेले असते.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या पर्यावरण कार्यक्रमानुसार, युद्ध संपल्यानंतरच्या काळात पर्यावरणाचे पुनर्वसन करणे हे शांततेच्या प्रक्रियेचा अविभाज्य भाग आहे. युद्धोत्तर काळात पर्यावरणीय पुनर्बांधणी न केल्यास समाजात पुन्हा संघर्षाचे बीज पेरले जाते. त्यामुळे 'ग्रीन पीस' आणि 'यूएनईपी' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी युद्धग्रस्त भागांमध्ये पर्यावरणीय स्थिरता निर्माण करण्यासाठी विशेष उपक्रम सुरू केले आहेत. हे उपक्रम केवळ पुनर्वसनापुरते नसून शाश्वत विकासाला गती देणारे आहेत.

भारतीय परंपरेत निसर्ग हा देवतासमान मानला गेला आहे. ''पृथ्वी ही माता आहे आणि आपण तिचे पुत्र आहोत'' अशी भावना भारतीय संस्कृतीत रूजलेली आहे. महात्मा गांधींनी सांगितले होते की, ''पृथ्वी प्रत्येकाच्या गरजा भागवू शकते, पण कोणाच्याही लोभासाठी नाही.'' हीच विचारसरणी युद्धोत्तर जगासाठी मार्गदर्शक ठरते. भारताने नेहमीच शांततेचा आणि अहिंसेचा संदेश दिला आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांमध्ये भारताने पर्यावरणीय समतोल, हवामान कृती, आणि सामाजिक न्याय या तीन मूलभूत तत्त्वांना केंद्रस्थानी ठेवले आहे.

समाजशास्त्र आपल्याला शिकवते की कोणतीही सामाजिक समस्या ही एकटी नसते; ती विविध घटकांशी गुंफलेली असते. युद्ध आणि पर्यावरणीय संकट हेदेखील तसेच परस्परसंबंधित विषय आहेत. युद्ध हा केवळ राजकीय प्रश्न नाही, तर तो सामाजिक असमानता, आर्थिक विषमता, आणि सांस्कृतिक अविश्वास यांचे मूळ आहे. जेव्हा समाजात शाश्वत विकास, सामाजिक न्याय, आणि पर्यावरणीय समता या मूल्यांचा अभाव असतो, तेव्हा युद्ध अपरिहार्य बनते. म्हणूनच युद्ध रोखण्यासाठी पर्यावरणसंवर्धन आणि सामाजिक समता या दोन्ही गोष्टींना समान प्राधान्य देणे आवश्यक आहे.

आजच्या घडीला हवामानबदल, पाण्याची टंचाई, प्रदूषण आणि संसाधनांची टंचाई या जागतिक समस्या आहेत. जर या समस्यांकडे दुर्लक्ष झाले, तर भविष्यकाळात युद्धाचे नवे कारण ही पर्यावरणीय असमानता असेल. म्हणूनच ६ नोव्हेंबरचा हा दिवस आपल्याला फक्त भूतकाळातील चुकांची जाणीव करून देत नाही, तर भविष्यातील धोकेही दाखवतो. युद्धकाळातील पर्यावरणाचे रक्षण करणे म्हणजे मानवतेचे रक्षण करणे होय.

शांतता आणि पर्यावरण हे एकमेकांचे पर्याय नाहीत, तर परस्पर पूरक आहेत. जेव्हा समाज पर्यावरणाशी सुसंवाद साधतो, तेव्हाच तो खऱ्या अर्थाने शांततेच्या दिशेने वाटचाल करतो. म्हणूनच आजच्या पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे ''हिरवी शांतता संस्कृती'' निर्माण करणे अशी संस्कृती जी पर्यावरण, मानवता आणि समाज यांना समान महत्त्व देईल. शिक्षण, माध्यमे, समाजसंस्था आणि शासन यांच्या समन्वयातून पर्यावरणपूरक जीवनशैली, पुनर्निर्मित उर्जा, आणि संसाधनांचे शाश्वत वापर यांची सवय लावणे ही काळाची गरज आहे.

शेवटी, युद्ध आणि पर्यावरण यांच्यातील नाते समजून घेणे म्हणजेच मानवतेच्या भविष्यासाठी जबाबदारी स्वीकारणे होय. युद्ध जिंकणारे राष्ट्र कधीही खरे विजेते नसते; खरे विजेते तेच जे आपल्या भूमीचे, आपल्या समाजाचे आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करतात. म्हणूनच हा ६ नोव्हेंबरचा दिवस आपल्याला स्मरण करून देतो की 'शांती म्हणजे फक्त युद्धाचा अभाव नाही, तर पर्यावरणीय संतुलनाचा सन्मान आहे.'

'पृथ्वी आपली मालकी नाही, आपण तिचे पालक आहोत, तिचे रक्षण करणे हीच खरी देशभक्ती आहे.'



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## महत्त्वाचे...

### नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे ११-१२ नोव्हेंबर रोजी हरित हायड्रोजनवरील आंतरराष्ट्रीय परिषद

नवी दिल्ली : केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाने नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे ११-१२ नोव्हेंबर रोजी हरित हायड्रोजनवरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे (घ्ण्उप २०२५) आयोजन केले आहे. या परिषदेत नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा तसेच ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी, पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू, अन्न आणि सार्वजनिक वितरणमंत्री हरदीप सिंग पुरी आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच पृथ्वी विज्ञान विभागाचे स्वतंत्र प्रभार राज्य मंत्री डॉ. जितेंद्र सिंह सहभागी होणार आहेत. हरित हायड्रोजनवरील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या निमित्ताने केंद्र सरकारचे अधिकारी, तंत्रज्ञ, विद्यार्थी, प्रतिनिधी, उद्योगजगताचे प्रतिनिधी आणि माध्यम तज्ञ एकत्र येतील. हरित हायड्रोजनचा विकास आणि विविध क्षेत्रांमध्ये त्याचा अवलंब या मुद्द्यांवर या परिषदेत भर दिला जाईल. कार्यक्रमाचे वेळापत्रक आणि नोंदणी तपशील ै.ग्प्प्.ग वर उपलब्ध आहेत. ही परिषद म्हणजे राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशनला गती देऊन त्या दिशेने प्रगती करण्याच्या केंद्र सरकारच्या प्रयत्नांचा एक भाग आहे. संकल्पनाधिष्ठित संवादसत्रे आणि गोलमेज परिषदांनी युक्त या परिषदेचा उद्देश हरित हायड्रोजन उत्पादनाला चालना देण्यासाठी, पायाभूत सेवा सुविधांचा विस्तार तसेच मागणीत वाढ करण्यासह जागतिक सहकार्याला प्रोत्साहन देण्यासाठी व्यावहारिक मार्गाबद्दलच्या ज्ञानाचा प्रसार करणे, असा आहे. वित्तपुरवठा, प्रमाणन, बंदर सज्जता , कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाचे स्थानिकीकरण तसेच विविध भौगोलिक क्षेत्रांमध्ये सुसंगतता यावर लक्ष केंद्रित करणारी सत्रे आयसीजीएच २०२५ चे मुख्य आकर्षण असतील. हरित हायड्रोजन, स्वच्छ, किफायतशीर आणि देशांतर्गत ऊर्जा उत्पादनासाठी भारत करत असलेल्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग असल्याचे नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाचे सचिव तसेच सोलार एनर्जी कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (एएण्ध) चे अध्यक्ष संतोष कुमार सारंगी या आगामी परिषदेबद्दल बोलताना, म्हणाले.

# न्यायालये केवळ इमारती नसून लोकशाही मूल्यांचे प्रतीक : सरन्यायाधीश भूषण गवई

## वांद्रे पूर्व येथे उच्च न्यायालय संकुलाची पायाभरणी व कोनशीलेचे अनावरण

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : न्यायालयीन इमारती या केवळ भव्य नसाव्यात, तर त्या न्याय, समानता, बंधुता आणि स्वातंत्र्य या संविधानातील मूल्यांचे मूर्त रूप असाव्यात. त्या प्रत्येक नागरिकाला न्यायप्रवेश सुलभ करणाऱ्या ठराव्यात, असे प्रतिपादन सरन्यायाधीश भूषण गवई यांनी केले.

उच्च न्यायालयाच्या नवीन संकुलाचा पायाभरणी आणि कोनशिला अनावरण कार्यक्रम वांद्रे पूर्व येथील शासकीय वसाहत परिसरात पार पडला. या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह भोसले तसेच न्यायव्यवस्था, प्रशासन आणि पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सरन्यायाधीश गवई म्हणाले की, न्यायालयीन इमारतींचे बांधकाम केवळ वास्तुशास्त्राचे उदाहरण नसून, त्या देशातील लोकशाही मूल्ये आणि न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास टिकवून ठेवणाऱ्या संस्था आहेत. ही इमारत फक्त वास्तू नाही, तर न्याय आणि पारदर्शकतेचे मंदिर आहे. येथे नागरिक, वकील आणि न्यायाधीश या सर्वांना समसमान सुविधा मिळतील. प्रत्येक प्रकल्पामध्ये पर्यावरणपूरक आणि हरित वास्तुकलेचा विचार करण्यात आला आहे. महाराष्ट्र नेहमीच पायाभूत सुविधांमध्ये अग्रेसर राहिला आहे. राज्य शासनाकडून न्यायव्यवस्थेच्या गरजांनुसार आधुनिक इमारती, तंत्रज्ञान आणि सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. हे संकुल राज्याच्या न्यायसंस्थेचे प्रतीक असलेले एक आधुनिक आणि वैभवशाली बांधकाम असेल.

सरन्यायाधीश गवई यांनी राज्यातील नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथील न्यायालयीन संकुलांचाही उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, या सर्व प्रकल्पांमुळे न्यायिक प्रक्रियेत पारदर्शकता, गती आणि सुलभता वाढेल. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील उच्च न्यायालयीन न्यायाधीश, वकील संघटना व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या सहकार्याचेही कौतुक केले. न्यायदान प्रणाली कार्यक्षम होण्यासाठी न्यायाधीश आणि वकिलांनी परस्पर सहकार्याने काम केले पाहिजे. दोन्ही घटक मिळूनच न्यायव्यवस्थेचे सुव्यवस्थापन शक्य होते, असेही त्यांनी सांगितले.

मुख्य न्यायमूर्ती गवई यांनी महाराष्ट्र शासनाचे, विशेषतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि संबंधित समित्यांचे कौतुक करताना सांगितले की, गतिशील नेतृत्वामुळे न्यायालयीन पायाभूत सुविधा विक्रमी वेगाने उभ्या राहत आहेत. या इमारती नागरिकांसाठी न्याय, समानता आणि बंधुता या राज्यघटनेतील तत्त्वांचे प्रतीक ठरतील.

**लोकशाही मूल्यांचे प्रतिबिंब असलेली भव्य न्यायालयीन इमारत उभारूया –मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

उच्च न्यायालयाची ही इमारत केवळ सुंदरच नव्हे, तर देशातील सर्वात जलद आणि स्मार्ट इमारत म्हणून ओळखली जाईल. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून ही इमारत पूर्णपणे 'एआय-सक्षम' असेल. भविष्यात उच्च न्यायालयाची ही इमारत देशातील इतर न्यायालयांसाठी आदर्श ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ही इमारत लोकशाही मूल्यांचे वैभव असावी, राजेशाही दिमाखाचे नसावी, तसेच ही इमारत जनतेला न्याय मिळण्याचे प्रतीक ठरावी,



अशी अपेक्षा मुख्यमंत्री फडणवीस यांनी नव्या न्यायालयीन इमारतीच्या रचनेबाबत वास्तुशिल्पकार हाफिज कॉन्ट्रक्टर यांच्याकडे व्यक्त केली. उच्च न्यायालयातील अनेक सरकारी वकीलांना पुरेशी जागा आणि आवश्यक सोयी सुविधांचा समावेश असावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

**न्याय म्हणजे जनकल्याणाची साधना मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर**

न्याय म्हणजे केवळ कायद्याचा अंमल नव्हे, तर ती लोककल्याणाची साधना आहे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी केले. न्यायाची खरी ओळख म्हणजे लोकांच्या हितासाठी कार्य करणे. न्यायालये केवळ प्रकरणे सोडविण्याची ठिकाणे नसून, ती समाजाच्या नैतिकतेचे आणि सामूहिक मूल्यांचे प्रतिबिंब आहेत. न्याय म्हणजे समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी देण्याचा आणि त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्याचा प्रयत्न आहे.

ते म्हणाले की, न्यायसंस्थेची जबाबदारी केवळ आपल्या देशापुरती मर्यादित नसावी. जगभरातील लोकांनी आपल्या न्यायव्यवस्थेतील प्रामाणिकपणा आणि पारदर्शकतेचे कौतुक करावे. समाजातील सर्व घटकांच्या सहकार्याने आपण न्यायाच्या नव्या उंचीवर पोहोचू शकतो. या मार्गावर समाजाचा विश्वास हीच खरी प्रेरणा आहे, असेही त्यांनी सांगितले.

**न्यायव्यवस्था सर्वसामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवणारी व्हावी : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

राज्यघटनेच्या अमृत महोत्सवी वर्षात उच्च न्यायालयाच्या नव्या इमारतीच्या कामाला प्रारंभ होत आहे, ही बाब अत्यंत आनंदाची असून न्यायव्यवस्था अधिक सक्षम, पारदर्शक आणि सर्वसामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवणारी व्हावी, यासाठी हे पाऊल ऐतिहासिक ठरणार आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

न्यायव्यवस्थेच्या बळकटीसाठी शासन सदैव कटिबद्ध आहे. न्यायालयीन विषयांबाबत शासनाचा निर्णय क्षणार्धात घेतला जातो, कारण शेवटच्या घटकापर्यंत न्याय मिळावा हेच शासनाचे ध्येय आहे. ही नवी वास्तू केवळ न्यायालयाची इमारत नाही, तर ती न्यायाच्या परंपरेचा आणि लोकशाही मूल्यांचे प्रतीक आहे. पुढील शंभर वर्षांचा विचार करून या प्रकल्पाची आखणी करण्यात आली आहे. मुंबईच्या कायदा आणि न्यायाच्या इतिहासात ही इमारत एक नवा अध्याय लिहिणार आहे. भविष्यात या वास्तूच्या उभारणीसाठी आणि न्यायव्यवस्थेच्या गरजांसाठी शासन कोणतीही तडजोड करणार नसल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या इतिहासातील नवे पर्व : उपमुख्यमंत्री अजित पवार**

आजचा दिवस हा महाराष्ट्राच्या न्यायव्यवस्थेच्या दृष्टीने अतिशय आनंदाचा, अभिमानाचा आणि ऐतिहासिक आहे. हे उद्घाटन उच्च न्यायालयाच्या १५० वर्षांच्या वैभवशाली इतिहासातील नव्या पर्वाची सुरुवात आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, न्याय हा लोकशाहीचा मजबूत पाया आहे. प्रत्येक नागरिकाला समान न्याय मिळण्याचा अधिकार आहे. राज्य शासनाने न्यायप्रविष्ट प्रक्रियेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी अनेक पावले उचलली आहेत. कोल्हापूर येथे स्थापन करण्यात आलेला सर्किट बेंच लवकरच कायम बेंचमध्ये रूपांतरित होईल, अशी खात्री त्यांनी यावेळी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला सामान्य माणसापर्यंत न्याय पोहोचवण्याचा प्रयत्न शासन सतत करत आहे. स्वतंत्र भारतात न्यायव्यवस्था अधिक सुलभ, पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहे. या नवीन संकुलासाठी आवश्यक असणारा निधी राज्य शासनाकडून उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# अवजड उद्योग मंत्रालयाद्वारे विशेष गुणवत्तेच्या पोलादासाठीच्या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रारंभ

नवी दिल्ली : केंद्रीय पोलाद आणि अवजड उद्योग मंत्री एच. डी. कुमारस्वामी यांनी विशेष गुणवत्तेच्या पोलादासाठी राबवल्या जात असलेल्या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचा प्रारंभ केला. पोलाद मंत्रालयाच्या या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेमुळे आतापर्यंत ४३,८७४ कोटी रुपयांच्या गुंतवणूक हमी आणि ३०,७६० लोकांसाठी थेट रोजगाराची हमी मिळाली आहे. यासोबतच या योजनेअंतर्गत निश्चित केलेल्या विशेष गुणवत्तेच्या पोलादाचे अंदाजे १४.३ दशलक्ष टन इतक्या प्रमाणात उत्पादन घेतले जाईल अशी अपेक्षा आहे. सप्टेंबर २०२५ पर्यंत या योजनेच्या पहिल्या दोन टप्प्यांमध्ये सहभागी झालेल्या कंपन्यांनी २२,९७३ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असून १३,२८४ रोजगारही निर्माण केले आहेत.

जुलै २०२१ मध्ये केंद्रीय मंत्रिमंडळाने विशेष गुणवत्तेसाठीच्या उत्पादन संलग्न प्रोत्साहन योजनेला मंजुरी दिली होती. आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनांतर्गत देशाला पोलाद उत्पादनाचे जागतिक केंद्र बनवण्यासाठीचा एक महत्त्वाचा उपक्रम म्हणून या योजनेला ही मंजुरी दिली गेली होती. आता सुपर मिश्रधातू, ण्ींउध (विशेष प्रकारचे विद्युत पोलाद), स्टेनलेस स्टील उत्पादने, टायटॅनियम मि श्रधातू आणि लेपित पोलाद यांसारख्या प्रगत पोलाद उत्पादनांसाठी अधिकाधिक नवीन गुंतवणूक मिळवणे हा या योजनेच्या तिसऱ्या टप्प्याचा (उत्पादन संलग्न योजना १.२) मुख्य उद्देश आहे. यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निम ीण होतील, उच्च गुणवत्तेच्या पोलाद उत्पादनाची क्षमता वाढेल आणि विशेष गुणवत्तेच्या पोलादाच्या जागतिक म ूल्य साखळीत भारताला एक पसंतीचा पुरवठादार देश म्हणून स्थान मिळेल अशी यामागची अपेक्षा होती.

प्रोत्साहन संलग्न योजना १.२ अर्थात तिसऱ्या टप्प्याची प्रमुख वैशिष्ट्ये :

अर्ज करण्याची सुविधा : ही योजना सुरू झाल्यापासून ३० दिवसांमध्ये र्हीींि://श्रिळिी.ाशलेप.ले.ळप या पोर्टलच्या माध्यमातून ऑनलाईन अर्ज दाखल करता येतील.

पात्रता: अधिसूचित उत्पादनांचे संपूर्ण उत्पादन घेत असलेल्या भारतातील नोंदणीकृत कंपन्या अर्ज करण्यासाठी पात्र असतील.

उत्पादनाची व्याप्ती : तिसऱ्या टप्प्यात धोरणात्मक गुणवत्तेचे पोलाद, व्यावसायिक गुणवत्तेचे पोलाद (श्रेणी १ आणि २), लेपित तार उत्पादने या आणि अशा पाच व्यापक गुणवत्तेअंतर्गतच्या २२ उत्पादनांच्या उप श्रेण्यांचा समावेश आहे.

प्रोत्साहनपर लाभाचे दर : याअंतर्गत प्रोत्साहनपर लाभाचे दर, उत्पादनाची उप श्रेणी आणि वर्षातील उत्पादनावर आधारीत असून, ते चढ्या वाढीच्या विक्रीच्या ४म ते १५म पर्यंत असतील.

प्रोत्साहनपर लाभाचा कालावधी : या योजनेचे अंतर्गतचे प्रोत्साहनपर लाभ आर्थिक वर्ष २०२५-२६ पासून सुरू होऊन जास्तीत जास्त ५ वर्षासाठी उपलब्ध असतील, आणि प्रत्यक्षात आर्थिक वर्ष २०२६-२७पासून लाभाच्या वितरणाला सुरुवात होईल.

इतर बदल : किमतींसाठीचे आधारभूत वर्ष बदलून २०१९-२० ऐवजी २०२४-२५ असे केले गेले आहे.

# छत्तीसगडमध्ये पॅसेंजर- मालगाडीची समोरासमोर धडक, सहा प्रवाशी ठार

छत्तीसगड : छत्तीसगडमधील बिलासपूर येथे लालखदान रेल्वे स्थानकाजवळ मोठा रेल्वे अपघात घडला आहे. हावत्रडा रूटवर चालणारी पॅसेंजर ट्रेन आणि मालगाडीची समोरासमोर धडक झाली. त्यामध्ये आतापर्यंत सहा जणांचा मृत्यू झाल्याची माहिती आहे, तर अनेकजण जखमी आहेत. जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू असून मृतांच्या आकडेवारीत वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. रेल्वे प्रशासनाने त्वरित रेस्क्यू टीम आणि मेडिकल युनिट घटनास्थळी पाठवले आहे. स्थानिक प्रशासनही मदतीसाठी पोहोचले आहे. या अपघातामुळे संपूर्ण रूटवरील अनेक ट्रेन रद्द करण्यात आल्या असून काहींना पर्यायी मार्गान वळवण्यात आले आहे. कोरबा पॅसेंजर ट्रेन आणि मालगाडीमध्ये जोरदार धडक झाली. या अपघातात आतापर्यंत ६ प्रवाशांच्या मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. तसेच १२ पेक्षा जास्त प्रवासी जखमी झाले आहेत. या ठिकाणी बचाव कार्य सुरू असून लोकांचीही मोठी गर्दी जमली आहे. जखमी प्रवाशांना जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले असून त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. अपघात इतका जबरदस्त होता की पॅसेंजर ट्रेन मालगाडीवर चढली होती. घटनास्थळी प्रवाशांच्या किंचाळ्या आणि आरडाओरडामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. रेल्वे प्रशासन आणि स्थानिक प्रशासन यांनी बचाव कार्य त्वरित सुरु केले. अपघातामुळे अनेक ट्रेन पर्यायी मार्गावर पाठवण्यात आल्या आहेत. अपघाताचे कारण अद्याप अज्ञात असून, रेल्वे तपासणी सुरु आहे.राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेस नेते भूपेश बघेल यांनी या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आहे. तसेच या अपघातासाठी कारणीभूत असलेल्यांवर कारवाई करण्याचा इशाराही दिला.


## शब्दकोडे क्र. 02

आडवे शब्द

१. मृत्यूवर विजय मिळविणारा ४. फायदेशीर, हितावह ७. अवाजवी १०. संगीतातील एक राग १२. संत ज्ञानेश्वारांनी लिहिलेली प्रार्थना १४. मला १५. रसाने भरलेले, उदा.वर्णन १८. लबाडीचा हेतू १९. राबता, जाणे-येणे २१. मऊ २२. सद्वर्तन २३. पळसाच्या पानांची संख्या २४. बेकरीतील एक पदार्थ २५. लेखणी २७. उद्याच्या नंतरचा दिवस २८. नेभळट मनुष्य ३०. प्रत्येकाला त्याच्या कल्पनेनुसार परमेश्वर प्रतीत होतो या अर्थाची उक्ती. '-- -- -- देव!' ३२. एक चर्मवाद्य ३३. वांग्याचा खमंग पदार्थ ३४. तलमसुती कापड ३६. हिंमत, धैर्य ३८. गावातील गप्पाष्टकाची जागा ३९. छोटी बैलगाडी ४१. जन्म ४२. चिनीमातीची वाटी ४२अ. घरटे (संस्कृत) ४४. पत्नी ४५. फणसातील खाद्यभाग ४६. च्या शिवाय ४८. दरवाजा ४९. चंद्र ५०. तबकातील या शूभ्र पदार्थाने वातावरणशुद्धी होते ५१. रामचरित मानस लिहिणारे रामभक्त संत ५४. समाचार ५५. भांडण ५६. नमस्कार ५७. नवे कोरे ५९. कमळ ६१. बासरी ६२. कोलकाताचे विमानतळ ६४. व्रत ६७. टाळ्यांचा आवाज ६८. हिंदीत पाऊल, मराठीतले एक आडनाव ६९. प्रज्वलित, तापलेले

उभे शब्द

१. हरिण, एक नक्षत्र २. महाभारताचे मूळ नाव ३. मृत्यूदेवता ५. लवकर, वेगाने ६. बशीचा जोडीदार ७. अभिनेता ८. चणचण ९. अखबार ११. पुरुष १३. चाणक्यनीती १४. वर्षाचा बारवा भाग १६. एक मंगलवाद्य १७. वीस दस्ते कागद १९अ. संक्रांतीचे दान २०. रोखलेली नजर २२. मनाला टोचणारे दुःख २५. व्यायाम, परेड २६. शाकंभरी पौर्णिमेचा मराठी महिना २७. पुन्हापुन्हा २८. माळेतील मधला मोठा मणी २९. दिल्लीचे विमानतळ ३१. निषिद्ध, त्यागलेले ३५. नव्वद अंशाच्या आतील कोन ३६. महासर्प ३७. सिंहाची उपाधी ३८. बसण्याची फळी ४०. झकास, छान ४२. अनाथच्या विरुद्ध ४३. धडक ४४. पोते ४६. गणपतीचे एक नाव ४७. असामान्य, तुलना करता येणार नाही असा ४८. राजा-राणीची सेविका ५२. लाट, झटका, हुक्की ५३. एकूण एक सर्व ५४. कडक व चिवट ५७. दरवाजा ५८. नरमच्या विरुद्ध ६०. एक गळीत धान्य ६१. पवित्र ६३. हत्तीच्या गंडस्थळातील स्राव ६५. तात्पर्य ६६. दुःख, हळहळ



### शब्दकोडे क्र. 01 चे उत्तर

आडवे उत्तर

१.रक्तदाब ४.आपपर ७.अनावर ११.भटकंती १३.डबडबणे १४.बरका १६.वहाण १७.ताडी १८.पुरता १९.विळाभोपळा २२अ. पुणे २४.चर २५.पाचर २६.कस २९.आसपास ३०.कवायत ३२.परवानगी ३४.वारू ३५.शककर्ता ३७.लव ३९.जलद ४१.कमालखानीहार ४४.दारूड्या ४६.तुष्ट ४७.गोरस ४८.कबर ५०.कदरदान ५२.मावा ५३.वाचाळ ५५.सर ५७.शरीर ५९.मनाई ६०.वासा ६२.मळवट ६३.वर्तन ६४.जारणमारण ६६.कुवत ६७.नस ६९.रमा ७१.राग ७२.माळी ७४.पावा ७६.गजानन ७७.सटरफटर

उभे उत्तर

१.रघुवर २.दाभण ३.बट ४.माती ५.पडताळा ६.रबडी ७.अबला ८.नाणे ९.रबर १०.चुका १२.कंटाळा १५.रताळे १८.पुणेकर १९.विकसनशील २०.भोचकभवानी २१.परवा २२.नाच २३.वासरु २५.पातक २७.सवालजबाब २८.नांगी २९.आवाज ३१.यशस्कर ३३.नवल ३६.कणीदार ३८.रड्या ४०.दया ४१.कष्टकरी ४२.खानदान ४३.हात ४५.रुसवा ४७.गोवा ४८.कळ ४९.रसना ५१.दरवाजा ५२.मावळण ५४.चाकवत ५६.रईस ५७.शनिवार ५८.पुटकुळी ५९.मनन ६१.सारवान ६२.मरगळ ६५.मारा ६८.सपाट ७०.माग ७२.मात्र ७३.कोर ७५.वार

# बजाज फायनॅन्सने सणासुदीच्या कर्जांमध्ये २७% वाढ नोंदविली

## आर्थिक समावेशकतेला गती दिली; बजाज फायनॅन्सकडे पहिल्यांदा आलेले ५२% ग्राहक पहिल्यांदाच कर्ज घेणारे कर्जदार

दैनिक आपला विदर्भ

**लातूर / प्रतिनिधी:** सणासुदीच्या कर्जांवर GST सुधारणा आणि वैयक्तिक आयकरातील बदलांचा सकारात्मक प्रभाव प्रीमियमायझेशनचा ट्रेंड दिसून आला; ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कमी किंमतींमुळे लोकांनी प्रीमियम उत्पादनांची खरेदी केली, खास करून टीव्ही आणि एअर कंडिशनर्समध्ये लातूर ४ नोव्हेंबर २०२५: भारतातील सर्वात मोठी खाजगी क्षेत्रातील, नॉन-बँकिंग कर्जदाता कंपनी आणि बजाज फिनसर्व्हचा भाग असलेल्या बजाज फायनॅन्स लिमिटेडने आज सांगितले की, यंदाच्या सणासुदीच्या मोसमात त्यांना ग्राहकोपयोगी वस्तूंच्या कर्जांमध्ये वाढ झाल्याचे दिसून आले आहे. त्यांनी यावेळी विक्रमी उपभोक्ता कर्जे वितरित केली, जी गेल्या वर्षीच्या याच कालावधीच्या तुलनेत प्रमाणात २७% आणि मूल्यात २९% जास्त होती.

ग्राहकोपयोगी वस्तूंसाठी घेतल्या जाणाऱ्या कर्जांमधील या वाढीतून सरकारच्या नेक्स्ट जनरेशन ऋढढ सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांचा सकारात्मक परिणाम स्पष्ट दिसतो. उपभोक्त्याची खरेदी करण्याची क्षमता वाढविणे हेच या सुधारणांचे लक्ष्य होते.

२२ सप्टेंबर ते २६ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत बजाज फायनॅन्सने अंदाजे ६३ लाख कर्जे वितरित केली. या कालावधीत कंपनीने २३ लाख नवीन ग्राहक मिळवले, त्यापैकी ५२% ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते. अशाप्रकारे आर्थिक समावेशकतेत कंपनीने लक्षणीय प्रगती केली आहे.

बजाज फायनॅन्सचे अध्यक्ष संजीव बजाज म्हणाले, सरकारने केलेल्या नेक्स्ट जनरेशन GST सुधारणांचा तसेच वैयक्तिक आयकरात केलेल्या बदलांमुळे भारताच्या उपभोग-केंद्रित विकास गाथेला एक नवीन रेटा मिळाला आहे. दैनंदिन गरजेच्या वस्तू अधिक किफायतशीर बनवून सदर उपाययोजनांनी मध्यम आणि कमी उत्पन्न असलेल्या कोट्यावधी कुटुंबांना सणासुदीच्या मोसमात आत्मविश्वासाने खरेदी करण्याचे बळ दिले. हा सकारात्मक प्रभाव केवळ उपभोक्ता कर्ज वितरणात झालेल्या २७% वाढीतून दिसत नाही, तर अधिक चांगल्या जीवनशैलीसाठी उच्च गुणवत्तेच्या उत्पादनांकडे वळण्याच्या ग्राहकांच्या वृत्तीमधून देखील दिसतो.

ते पुढे म्हणाले, या सणासुदीच्या मोसमात आमच्याकडे आलेल्या नवीन ग्राहकांपैकी अर्ध्याहून जास्त ग्राहक हे पहिल्यांदाच कर्ज घेत होते. आपले पहिले कर्ज या औपचारिक आर्थिक प्राणलीमधून घेण्याचे त्यांनी पसंत केले.

बजाज फायनॅन्सचे डिजिटल प्लॅटफॉर्म आणि देशभरातील ४२०० ठिकाणी असलेल्या २३९,००० सक्रिय वितरण केंद्रांच्या उपस्थिती सह आम्ही आर्थिक समावेशकता अधिकाधिक रुजवण्याचा आणि भारतीय उपभोक्त्याच्या उत्थानाला बळ देण्याचा प्रयत्न करत आहोत.

टेलिव्हिजन आणि एअर कंडिशनर्सवरील कमी GST मुळे ग्राहक आपल्या कर्जांच्या सरासरी तिकीट साइझमध्ये ६% घट करू शकले आहेत आणि त्याचबरोबर उच्च गुणवत्तेची उत्पादने खरेदी करू लागले आहेत. टेलिव्हिजनसाठी देण्यात आलेल्या कर्जात प्रीमियमायझेशनचा ट्रेंड स्पष्ट दिसून आला आहे. कंपनीने टीव्हीसाठी दिलेल्या एकूण कर्जापैकी ७१% कर्जं ४०-इंच किंवा त्यापेक्षा मोठ्या स्क्रीनच्या टीव्हीसाठी आहेत. गेल्या वर्षी हे प्रमाण ६७% होते.

एक वैविध्यपूर्ण, टेक-प्रेरित नॉन-बँकिंग कंपनी असलेल्या बजाज फायनॅन्सचे लक्ष निरंतर इनोव्हेशनवर केंद्रित आहे, जेणेकरून ग्राहकांची कर्जापर्यंतची पोहोच वाढावी आणि ग्राहक व व्यवसाय यांना कर्जाचा चांगला अनुभव मिळावा. या आघाडीच्या उपभोक्ता कर्ज प्रदाता कंपनीची मोबाइल फोन, इलेक्ट्रॉनिक्स, घरगुती उपकरणे, फर्निचर, रूफटॉप सोलर पॅनल्स आणि इतर अनेक उपभोक्ता-केंद्रित श्रेणींमध्ये लक्षणीय उपस्थिती आहे.

बजाज फायनॅन्स आपल्या डिजिटल प्लॅटफॉर्म्स आणि ऑन-ग्राउंड वितरण केंद्रांच्या माध्यमातून ११० मिलियन ग्राहक फ्रँचाईजला सेवा प्रदान करते. अधिक पारदर्शकतेसाठी ही कंपनी आपल्या ग्राहकांना १९ भाषांमधून कर्ज कराराचा एक भाग म्हणून की-फॅक्ट स्टेटमेंट प्रदान करते. ३० जून २०२५ रोजीच्या आकडेवारीनुसार बजाज फिनसर्व्ह ॲप ७५.१ मिलियन लोकांनी इन्स्टॉल केले आहे. हे ॲप कर्ज, ठेवी, विमा आणि गुंतवणूक याबाबत निर्बाध अनुभव आणि जलद पोहोच प्रदान करते.

माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबरमध्ये जाहीर केलेल्या नेक्स्ट जनरेशन GST सुधारणांपासून "GST बचत उत्सव' सुरू झाला. हे सरकारने उचललेले एक महत्त्वाचे पाऊल होते, ज्याच्यामुळे कर्ज संरचना सोपी झाली, कर कमी झाला आणि कुटुंबावरील ओझेही कमी झाले. यामुळे, लोकांना आपल्या आकांक्षा पूर्ण करता येणे शक्य झाले, तर उद्योजक, व्यापारी आणि चडचएी यांना व्यापार करण्यात सुलभता आली. २०१७ मध्ये GST दाखल केल्यानंतरच्या या सर्वात मोठ्या सुधारणा होत्या. ऋढढ दरांची पुनर्रचना आणि २०२५ मध्ये आयकरात करण्यात आलेली कपात यांचा उद्देश भारतीय कुटुंबांची खरेदी करण्याची क्षमता वाढविण्याचा आणि समावेशक वृद्धीच्या भारताच्या व्हिजनला बळकटी देण्याचा होता.

# ऑक्टोबरमध्ये व्यावसायिक वाहन क्षेत्रात मुसंडी; टाटा, महिंद्रा, अशोक लेलँडची जबरदस्त कामगिरी

नवी दिल्ली : सरकारच्या पायाभूत सुविधा विकासाच्या जोरदार धोरणामुळं आणि सणासुदीच्या काळात वाढलेल्या मालवाहतूक मागणीमुळं ऑक्टोबर २०२५ मध्ये व्यावसायिक वाहन (सीव्ही) क्षेत्रात वाढ झाल्याच दिसून आलं. एसीएम आयआयएलच्या अहवालानुसार, प्रमुख कंपन्यांनी वार्षिक आधारावर मजबूत वाढ नोंदवली, ज्यामुळं मालवाहतूक क्रियाकलाप सुधारलं आणि अर्थव्यवस्थेची स्थिरता दिसून आलीय.

टाटा मोटर्स

टाटा मोटर्सने ऑक्टोबरमध्ये एकूण व्यावसायिक वाहन विक्रीत ९.५ टक्के वार्षिक वाढ नोंदवली. एफवाय२६ च्या दुसऱ्या तिमाहीतील वाढीची गती कायम ठेवत, सलग चार तिमाहीतील घसरणीनंतर ही कामगिरी उल्लेखनीय ठरली. कंपनीची वाढ सर्वंकष होती - जड व्यावसायिक वाहने (एचसीव्ही) आणि लहान व्यावसायिक वाहने (एससीव्ही) यांनी उच्च एकअंकी वाढ दर्शवली. प्रवासी वाहतूक वाहनांनी १२.३ टक्के वाढ नोंदवली, जी मजबूत मालवाहतूक, सणासुदीच्या लॉजिस्टिक्स मागणी आणि स्थिर अर्थव्यवस्थेमुळं शक्य झाली. निर्यातीत तर ५६.२ टक्के प्रचंड वाढ झाली, ज्यामुळं आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील वर्चस्व कायम राहिलं.

महिंद्रा अँड महिंद्रा

महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम) नेही १४.० टक्के वार्षिक वाढ नोंदवलीय. ही वाढ प्रामुख्यानं हलकी व्यावसायिक वाहनं (एलसीव्ही) २टी-३.५टी श्रेणीतील १३.८ टक्के वाढीमुळं झाली. ग्रामीण भागातील सुधारलेली क्रियाकलाप आणि सणासुदीची मालवाहतूक मागणी यामुळं हे घडलं. मात्र, मध्यम आणि जड ट्रक-बस (एमटीबीडी) विभागात १.५ टक्के किरकोळ घसरण झाली.

एसएमएल इसुझू आणि आयशर मोटर्स

एसएमएल इसुझूनं ३२.२ टक्के जोरदार वार्षिक वाढ नोंदवली. मालवाहतूक आणि प्रवासी वाहन दोन्ही श्रेणींमध्ये वाढलेली मागणी याला कारणीभूत ठरली. अशोक लेलँडची विक्री १६.४ टक्क्यानं वाढली. मध्यम-जड व्यावसायिक वाहनं (एम अँड एचसीव्ही) १५.५ टक्के, तर हलकी व्यावसायिक वाहनं (एलसीव्ही) १७.८ टक्केनं वाढली. सणासुदीची मागणी, पायाभूत सुविधा यामुळं ही वाढ झाली. निर्यातीत २१.२ टक्के वाढ झाली, ज्यामुळं परदेशी बाजारपेठेतील स्थिरता दिसते. आयशर मोटर्सच्या व्हीईसीव्हीनं १३.२ टक्के वार्षिक वाढ साधली. मागील वर्षी ५.० टक्के घसरणीनंतर ती प्रभावी ठरली. देशांतर्गत विक्री ६.९ टक्के वाढ झाली.निर्यातीत मात्र १३३.७ टक्के प्रचंड वाढ झाली.

एसीएमआयआयएलच्या अहवालानुसार, ऑक्टोबरमधील सीव्ही उद्योगाची कामगिरी चांगली राहिली. सुधारलेली मालवाहतूक, पायाभूत सुविधा विकास आणि सणासुदीची मागणी यामुळं हा ट्रेंड कायम राहील,अशी शक्यता वर्तवण्यात येत आहे. उद्योगाला स्थिर अर्थव्यवस्थेचा आधार मिळत असल्यानं पुढील महिनंही आशादायक असतील असा अंदाज आहे.

# हरियाणामध्ये २५ लाख मतांची चोरी, राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर गंभीर आरोप

नवी दिल्ली : बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी उद्यापासून (६ नोव्हेंबर) मतदान होणार आहे. या मतदानापूर्वी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आज नवी दिल्लीतील अखिल भारतीय काँग्रेस समिती (एआयसीसी) मुख्यालयात पत्रकार परिषद घेतली. यावेळी मत चोरीच्या मुद्द्यावरून त्यांनी हायड्रोजन बॉम्ब सोडला. हरियाणा विधानसभा निवडणुकीत घोळ झाल्याचा आरोप करत हरियाणामध्ये २५ लाख मतांची चोरीला झाल्याचा दावा राहुल गांधी यांनी केली आहे.

२२ वेळा बनावट ओळखपत्र वापरून मतदान : अनेक राज्यांमधून मत चोरीच्या तक्रारी आल्याचं राहुल गांधी यांनी सांगितलं. ते म्हणाले,'' हरियाणामध्ये मत चोरी झाल्याचं आढळून आलं. हरियाणामध्ये, एक्झिट पोलमध्ये काँग्रेस पुढं होती. नंतर भाजपाचा विजय झाला. २५ लाख मतं चोरीला गेली. कर्नाटकातील महादेवपुरा इथंही अशीच एक घटना घडली. तसचं हरियाणातील १० मतदान केंद्रांवर एका मुलीनं २२ वेळा बनावट ओळखपत्र वापरून मतदान केलं. अनेक मतदार यादीत एका ब्राझिलियन मॉडेलचा फोटो वापरण्यात आला,'' असं राहुल गांधी यांनी सांगत निवडणूक आयोगावर आरोप केले आहेत.

# बिल्डिंगमधील रहिवासी आता जमिनीचे वैयक्तिक हिस्सेदार होणार; महसूल विभाग नवा नियम आणण्याच्या तयारीत

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी** : शहरांत राहणाऱ्या नागरिकांसाठी एक मोठी दिलासादायक बातमी आहे. बिल्डिंगमधील प्रत्येक फ्लॅटधारकाला आता स्वतंत्र मालकी हक्काचा कायदेशीर पुरावा मिळणार आहे. आतापर्यंत इमारतीची जमीन ही गृहनिर्माण सोसायटी किंवा सदस्यांच्या एकत्रित नावावर नोंदवली जात होती. मात्र, आता महाराष्ट्र सरकार 'व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड' आणणार आहे. या कार्डद्वारे प्रत्येक रहिवाशाला जमिनीचा वैयक्तिक हिस्सा मिळेल आणि सातबारा उताऱ्यावरही त्यांचे नाव चढेल. नेमके ही योजना काय आहे, तिचे फायदे काय आणि सरकारची तयारी कशी सुरू आहे, याविषयी सविस्तर आढावा.

व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड म्हणजे काय? : व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड हे एक प्रकारचे पूरक मिळकत पत्रिका आहे, जे मुख्य प्रॉपर्टी कार्डच्या जोडीला प्रत्येक सदनिकाधारकाला वैयक्तिकरीत्या दिले जाणार आहे. यात इमारतीखालील एकूण क्षेत्रफळ आणि प्रत्येक फ्लॅटधारकाचा वैयक्तिक हिस्सा नोंदवला जाईल. विशेष म्हणजे हे कार्ड प्रॉपर्टी कार्ड असलेल्या इमारतींसोबतच सातबारा उताऱ्यावर नोंद असलेल्या इमारतींनाही लागू होईल. यामुळे गृहनिर्माण सोसायट्या किंवा अपार्टमेंटमधील प्रत्येक रहिवाशाला जमिनीचा स्वतंत्र मालकी हक्क मिळेल, जो कायदेशीरदृष्ट्या अबाधित राहील. उदाहरणार्थ, एखादी इमारत १० फ्लॅट्सची असेल आणि तिची जमीन ५ हजार चौरस फूट असेल, तर मुख्य प्रॉपर्टी कार्डवर सोसायटीचे नाव असेल. पण व्हर्टिकल कार्डद्वारे प्रत्येक फ्लॅटधारकाला त्यांच्या हिश्श्यातील क्षेत्रफळाची नोंद मिळेल, जसे की ५०० चौरस फूट जमिनीचा हक्क. हे कार्ड डिजिटल स्वरूपात असेल, ज्यामुळे एका स्कॅनमध्ये इमारतीची संपूर्ण माहिती, फ्लॅट क्रमांक, क्षेत्रफळ, मालकी हक्क समोर येणार आहे.

रहिवाशांना काय फायदा होणार? : या नवीन प्रणालीमुळे सामान्य रहिवाशांना अनेक फायदे मिळतील. पहिला आणि सर्वात मोठा फायदा म्हणजे वैयक्तिक मालकी हक्काचा कायदेशीर पुरावा आहे. आतापर्यंत फ्लॅट विक्रीसाठी महापालिकेची कर पावती आणि खरेदी-विक्री करारनामा पुरेसा वाटत असला तरी जमिनीचा हक्क सिद्ध करण्यासाठी सोसायटीवर अवलंबून राहावे लागत असे. आता हे कार्ड हाती आल्यावर बँक कर्ज, मालमत्ता हस्तांतरण किंवा वारसा प्रमाणपत्रासाठी कोणतीही अडचण येणार नाही.

प्रत्येकाचा हिस्सा स्पष्टपणे नोंदवला जाणार : दुसरा फायदा म्हणजे पारदर्शकता येणार आहे. सातबारा उताऱ्यावर प्रत्येकाचे नाव चढल्याने भविष्यातील वाद टाळता येतील. उदाहरणार्थ, सोसायटीच्या व्यवस्थापनातील गैरप्रकार किंवा जमिनीच्या हक्कांवरून होणारे वाद आता कमी होतील, कारण प्रत्येकाचा हिस्सा स्पष्टपणे नोंदवला जाईल. तिसरा हे डिजिटल कार्ड असल्याने कागदपत्रं शोधणे सोपे होईल. विशेषत: मुंबई, पुण्यासारख्या महानगरांमध्ये, जिथं लाखो फ्लॅट्स आहेत, तिथं हे कार्ड रहिवाशांच्या हितांचे रक्षण करेल. महाराष्ट्रात सुमारे १० लाखांहून अधिक गृहप्रकल्प आहेत आणि त्यातील अनेक रहिवासी अजूनही मालकी हक्काच्या पुराव्यांसाठी झगडत आहेत. हे कार्ड लागू झाल्याने विशेषत: नवीन प्रोजेक्ट्समध्ये, बँकांकडून कर्ज मंजुरी आणि रिअल इस्टेट व्यवहार वेगवान होतील.

उच्चस्तरीय समिती स्थापन - महसूलमंत्री बावनकुळे : याविषयी माहिती देताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, ''आम्ही व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड देण्याचा विचार करीत आहोत, यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. महसूल विभागाच्या अप्पर मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करेल आणि एका महिन्याच्या आत शासनाला अहवाल सादर होईल. एखाद्या भूखंडावर व्हर्टिकल इमारत उभी राहिली, तर त्या क्षेत्रफळातील जागेच्या सातबाऱ्यावर सर्व रहिवाशांची नावं चढतील. आतापर्यंत रहिवाशांकडे मुद्रांक शुल्क, दस्तनोंदणी आणि पालिका किंवा ग्रामपंचायतीची करपावती इतकीच कागदपत्रं असायची. ती महसुली प्रॉपर्टी कार्ड नाहीत. त्यामुळे आम्ही असा विचार करतो आहोत, की संबंधित इमारतीत जितके लोक राहतात, त्या सगळ्यांची नावं सातबारावर आली पाहिजेत, त्यासाठी व्हर्टिकल प्रॉपर्टी कार्ड देण्याचा विचार आम्ही करीत आहोत'', अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

२०१९मध्ये मंजूर झाला होता प्रस्ताव : २०१९ मध्ये भूमी अभिलेख विभागाने प्रत्येक सदनिकेसाठी पूरक कार्डचा प्रस्ताव तयार केला होता. ऑगस्ट २०१९ मध्ये मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आणि प्रारूप नियमावलीसाठी सूचना दिल्या. जून २०२० पर्यंत हरकती-सूचना घेऊन नियमावली शासनाकडे पाठवली गेली. विधी विभागाच्या सूचना लागू करून सुधारित आवृत्ती तयार झाली. आता महसूल विभागाच्या सूचनेनुसार सातबारा उताऱ्याचा समावेश करून नवीन प्रस्ताव तयार होत आहे. पहिल्या टप्प्यात प्रॉपर्टी कार्ड असलेल्या गृहनिर्माण संस्थांना हे कार्ड दिले जाईल (ज्या जागा एनए झालेल्या आणि बांधकाम परवानगी असलेल्या). दुसऱ्या टप्प्यात प्रत्येक सदनिकाधारकाला वैयक्तिक कार्ड मिळेल. ही योजना मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरांमध्ये प्राधान्याने लागू करण्याची योजना महाराष्ट्र सरकारने आखली आहे.

## विविध वृत्त...

### राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरु नानक देव जी यांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला दिल्या शुभेच्छा

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी गुरू नानक देवजी यांच्या जयंतीनिमित्त देशवासीयांना शुभेच्छा दिल्या आहेत. राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटले आहे, ''गुरु नानक देव जी यांच्या जयंतीनिमित्त, मी भारतात आणि परदेशात राहणाऱ्या सर्व भारतीयांना, विशेषत: शीख बंधू आणि भगिनींना हार्दिक शुभेच्छा देते. हा दिवस आपल्याला गुरु नानक देव जी यांची शिकवण आणि मूल्यांचा अंगिकार करण्याची प्रेरणा देतो आणि एका उत्तम समाजाची निर्मिती करण्यासाठी मार्गदर्शन करतो. सत्य, न्याय आणि करुणा या मूल्यांवर आधारित जीवन जगणे हेच खऱ्या यशाचे परिमाण आहे असा संदेश त्यांच्या शिकवणुकीतून आपल्याला मिळतो. त्यांची शिकवण एक ईश्वर आणि मानवसमतेचा संदेश देते. ते आपल्याला प्रामाणिकपणे जीवन जगण्यासाठी आणि आपली साधनसंपत्ती एकमेकांशी वाटून घेण्यासाठी प्रेरित करतात. आपण सर्व जण आपल्या जीवनात गुरु नानक देव जी यांच्या आदर्शांना आत्मसात करुया आणि अधिक शांततामय आणि समृद्ध राष्ट्राच्या उभारणीसाठी त्यांनी दाखवलेल्या मार्गावर वाटचाल करुया.

### इक्कीस चित्रपटातून अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया करणार बॉलिवूडमध्ये पदार्पण, अगस्त्य नंदा दिसणार प्रमुख भूमिकेत

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :अभिनेता अहान पांडे आणि अनीत पड्डानंतर, एक नवीन चेहरा बॉलिवूडमध्ये चमकण्यासाठी सज्ज आहे. अक्षय कुमारची भाची सिमर भाटिया ही श्रीराम राघवन दिग्दर्शित इक्कीस चित्रपटातून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणार आहे. आता अक्षयनं त्याच्या इंस्टाग्राम स्टोरीवर सिमरच्या मोठ्या पडद्यावर पदार्पणाबद्दल आनंद व्यक्त करत पोस्ट आणि ट्रेलर शेअर केला आहे. त्यानं आपल्या पोस्टमध्ये लिहिलं, ''माझी छोटी सिमी आता इतकी लहान नाही... इक्कीसमधील तुझ्या लिविंग रूम परफॉर्मन्सपासून तर मोठ्या पडद्यावर, माझे मन अभिमानानं भरले आहे! १८. आणि अगस्त्याची, किती छान पडद्यावर उपस्थिती! संपूर्ण टीमला खूप खूप शुभेच्छा.''

ट्विंकलनं सिमर भाटियावर केला प्रेमाचा वर्षाव : यानंतर सिमरनं तिच्या इंस्टाग्राम स्टोरीवर अक्षयची पोस्ट पुन्हा शेअर करत उत्तर दिलं, मी नेहमीच तुझ्यासाठी लहान सिमी राहीन. प्रत्येक गोष्टीसाठी धन्यवाद. मी तुझ्यावर खूप प्रेम करते.'' ट्विंकल खन्नानं देखील एक पोस्ट शेअर केली आहे यात तिनं लिहिलं, ''आमच्या १८ आता चित्रपट जगात प्रवेश केला आहे. किती सुंदर गोष्ट आहे. शाब्बास, माझी हुशार मुलगी.'' तसेच सिमरनं उत्तरात लिहिलं, याबद्दल खूप खूप धन्यवाद. माझ्यावर तुमचे आशीर्वाद आहेत... मला आणखी काय हवे आहे.'' दरम्यान सिमर भाटिया अक्षयची बहीण अलका भाटिया यांची मुलगी आहे.

इक्कीस चित्रपटाबद्दल : अलका यांनी १९९७ मध्ये वैभव कपूरशी लग्न केलं. यानंतर त्यांना पहिली मुलगी सिमर झाली. नंतर हे जोडपे वेगळे झाले. यानंतर २०१२ साली अलका यांनी रिअल इस्टेट टायकून सुरेंद्र हिरानंदानीबरोबर लग्न केलं.इक्कीस चित्रपटात भारतातील सर्वात तरुण परमवीर चक्र विजेता, सेकंड लेफ्टनंट अरुण खेतरपाल यांच्या शौर्याबद्दलची कहाणी सांगितली जात आहे. जेव्हा ते युद्धात हुतात्मा झाले तेव्हा त्याचे वय फक्त २१ वय वर्षाचं होतं. निर्मात्यांनी ट्रेलर रिलीज करताना पोस्टमध्ये लिहिलं, तो एकवीस वर्षांचा होता, तो नेहमीच एकवीस वर्षांचा राहील! या चित्रपटामध्ये अभिनेता धर्मेंद्र अरुण खेतरपालच्या वडिलांची भूमिका करत आहे. तसेच जयदीप अहलावत चित्रपटात भारतीय सैन्य अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार आहे. या चित्रपटाचं दिग्दर्शन श्रीराम राघवन यांनी केलं असून याची निर्मिती दिनेश विजन करत आहे.

### जळगावमध्ये हाय व्होल्टेज निवडणूक! धरणगाव-चाळीसगाव-पाचोरात कोणाचा गेम होणार?

दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** जळगाव जिल्ह्यातील १६ नगरपरिषद आणि दोन नगरपंचायतींच्या निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. धरणगाव, चाळीसगाव आणि पाचोरा या तीन नगरपालिकांकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. या तिन्ही ठिकाणी स्थानिक नेत्यांमधील गटबाजी, युतीतील मतभेद आणि स्थानिक पातळीवरील प्रतिष्ठा आदी मुद्द्यांवरून ही निवडणूक अधिकच चुरशीची होणार आहे.

धरणगावमध्ये पालकमंत्री गुलाबराव पाटील आणि राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश केलेले माजी मंत्री गुलाबराव देवकर हे एकत्र येतील का, यावर संपूर्ण राजकीय समीकरण अवलंबून आहे. दोघांतील विधानसभेतील संघर्ष अद्याप थांबलेला नसला तरी धरणगाव येथील एका शिवसेना शिंदे गटाच्या मेळाव्यात पाटील यांनी देवकर आपल्या सोबत असतील असा संकेत दिले आहेत. मात्र ठाकरे गटाचे उपनेते गुलाबराव वाघ आणि माजी नगराध्यक्ष निलेश चौधरी हे या समीकरणाला कडवे आव्हान देण्याची शक्यता आहे. जळगव जिल्ह्यात शिवसेना शिंदे गट व शिवसेना ठाकरे गट यांच्यातच एकमेव प्रमुख लढत धरणगावात होणार होण्याची शक्यता असल्यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीची होईल, अशी शक्यता आहे.